लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
पृष्ठे : १०+८+४ (ऑक्सिजन) = २२, किंमत : ₹ ५.००
सातारा, गुरुवार, दि. ९ जानेवारी २०२०

# सायकलवरचा हातपंप, दिव्यागांसाठीचा 'थर्ड आय'

## शिवाजी विद्यापीठात संशोधनाचा 'आविष्कार'; सांगली, सातान्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सायकलवर चालणारा हातपंप आणि ठिंबक सिंचन व्यवस्था, दिव्यांग व्यक्तींसाठीचा 'थर्ड आय', गव्हाच्या पिठापासून बनविलेला चमचा, अपघात रोखणारी स्मार्ट स्ट्रीट लाईट, आदी स्वरूपातील संशोधनाचा 'आविष्कार' शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांना बुधवारी पाहायला मिळाला.

शिवाजी विद्यापीठस्तरावरील 'आविष्कार' हा संशोधन महोत्सव विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित केला होता. त्याचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी, मध्यवर्ती आविष्कार संशोधन महोत्सवाचे समन्वयक डॉ. एस. बी. महाडिक, डॉ. एस. बी. सादळे, आदी उपस्थित होते. या महोत्सवात कोरेगावच्या डी. पी. भोसले कॉलेजच्या अंकिता जाधव, प्रियांका यादव, शुभम लवळे यांनी टाकाऊ साहित्याच्या वापरातून साकारलेल्या सायकलवर चालणारा हातपंप आणि ठिंबक सिंचन व्यवस्थेचा प्रकल्प मांडला. रामानंदनगर-बुर्ली (ता. पलूस) येथील ए. एस. सी. कॉलेजच्या सत्यम तिरमारे याने अपघात रोखणाऱ्या 'स्मार्ट स्ट्रीट लाईट'चे संशोधन सादर केले. विद्यापीठातील कॉम्प्युटर सायन्सच्या रोहित पाटील आणि सूरज कुंभार यांनी दिव्यांगांसाठीचा 'थर्ड आय' हा मोबाईल ॲपशी जोडण्यात आलेला चष्मा सादर केला. वाळवा येथील क्रांतिसिंह नाना पाटील कॉलेजमधील पूजा माळी हिने प्लास्टिक चमच्याला पर्याय म्हणून गव्हाच्या पिठापासून बनविलेला चमचा सादर केला. महागाव येथील एस.जी.एम. कॉलेजच्या महेश अंगज, स्वप्नाली घोरपडे यांनी शेतीमध्ये सौरऊर्जा निर्मितीबाबतचे संशोधन मांडले. कोल्हापूर जिल्हा पिशवी खोऱ्यातील जलयुक्त शिवार योजनेचा सूक्ष्म अभ्यास, सोशल मीडियाचा वापर, महिला सक्षमीकरण, आदींबाबतच्या भित्तीपत्रकांचा समावेश होता.



आविष्कार संशोधन महोत्सवात कोरेगावच्या डी. पी. भोसले कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सायकलवर चालणाऱ्या हातपंपाचा प्रकल्प सादर केला.

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव